# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०




◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

Ref. No. PAHSUS/EXAM/CAP/२०२४/773 Date :- 2 APR 2024

## परिपत्रक 20

संलग्नित सर्व परीक्षा केंद्र असलेले महाविदयालये / संकुल यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, माहे मार्च / एप्रिल २०२४ मधील सर्व परीक्षा या दिनांक ०५ एप्रिल २०२४ रोजीपासून सुरु होत आहेत.

ऑक्टाबर / नोव्हेंबर २०२३ च्या परीक्षेप्रमाणेच मार्च / एप्रिल २०२४ च्या पारंपारिक पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षांचे मुल्यमापन ऑफलाईन पध्दतीने महाविद्यालयीन स्तरावरुन करण्यात येणार आहेत.

तर व्दितीय व तृतीय **वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या सत्राच्या** सर्व उत्तरपत्रिकेचे ऑफलाईन मूल्यमापनासाठी खालील महाविदयालयात मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र म्हणून निश्चीत करण्यात आले आहेत. त्यामुळे सर्व परीक्षा केंद्र असलेल्या महाविदयालयांनी त्यांच्या केंद्रावरील **व्दितीय व तृतीय वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या सत्राचे** सर्व पेपर हे सिलबंद करुन प्रत्येक पेपरच्या दुस-या दिवशी खाली दर्शविलेल्याप्रमाणे मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडे जमा करावेत. मात्र रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवशी मध्यवर्ती मूल्यामापन केंद्रास सुट्टी देण्यात आल्याने त्यादिवशी पेपर जमा न करता पुढील दिवशी जमा करण्यात यावे. **तसेच दि.०६/०४/२०२४ रोजी लोकसभा कामाजासाठी प्रशिक्षण असल्याने व दि.०७/०४/२०२४ रोजी रविवार असल्याने दि.०५/०४/२०२४ रोजी होणारे सर्व पेपर हे दि.०८/०४/२०२४ रोजी जमा करावे.**

@ **दयानंद कॉलेज आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर** - सोलापूर शहर, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट तालुका, मोहोळ तालुका, बार्शी तालुक्यातील शेळगांव, माढा तालुक्यातील माढा येथील सर्व परीक्षा केंद्रे

@ **श्री शिवाजी महाविदयालय, बार्शी** - बार्शी तालुका (शेळगांव वगळून), करमाळा तालुका, माढा तालुक्यातील कुर्डूवाडी व टेंभुर्णी येथील सर्व परीक्षा केंद्रे

@ **उमा महाविदयालय, पंढरपूर** - पंढरपूर तालुका, माळशिरस तालुका, मंगळवेढा तालुका, सांगोला तालुका, माढा तालुक्यातील मोंडनिंब येथील सर्व परीक्षा केंद्रे

हे पेपर जमा करत असताना खालील बाबींची तपासणी करुनच उत्तरपत्रिका जमा करुन घेतल्या जातील.

१) महाविदयालयाचे उत्तरपत्रिका जमा करणेबाबतचे पत्र असावे.

२) विदयार्थी उपस्थिती अहवाल Junior Supervisor Report (Present / Absent Report) दोन प्रतीत दयावा. त्यापैकी एक प्रत उत्तरपत्रिकेच्या गठठयावर व दुसरी प्रत महाविदयालयाच्या पत्रासोबत जमा करावी.

३) उपस्थिती / अनुपस्थिती अहवाल महाविदयालयाने विदयापीठाने दिलेल्या स्टेशनरीमधील फॉर्ममध्ये भरावा. Online फॉर्म काढून भरु नये.

४) सर्व उत्तरपत्रिकेची मोजणी करुन उत्तरपत्रिका जमा झाल्याबाबत पोहोच घेणे.

५) कॉपीकेस चा अहवाल स्वतंत्रपणे दोन्ही उत्तरपत्रिकासह विद्यापीठाकडे जमा करावा.

वरील सूचनेनुसार प्रत्येक परीक्षा केंद्रानी अंमलबजावणी करणे आवश्यक असून यामध्ये काही चूका आढळल्यास त्यास वरिष्ठ पर्यवेक्षक, परीक्षेशी संबंधित कर्मचारी व प्राचार्य यांची जबाबदारी राहिल. त्या परीक्षा केंद्राच्या उत्तरपत्रिका जमा करुन घेण्यात येणार नाहीत याची सर्व प्राचार्यांनी व संबंधितांनी नोंद घ्यावी.

वरील सूचनांचे पालन करुन उत्तरपत्रिका वेळेत उपरोक्त मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र येथे पोहोच कराव्यात.

02/04/19

डॉ. श्रीकांत ग. अंधारे
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ